मेट्रोच्या कामांना वेग, उत्तम सुविधा मिळावी म्हणून सर्व खटाटोप

# एकदा बघाच; भुयारी मेट्रोची स्थानके किती आलिशान !

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा - वांद्रे - सीप्झ या भुयारी मेट्रो ३ चे काम अत्यंत वेगाने सुरू असून, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने या मार्गावरील स्थानकांच्या कामांच्या पूर्णत्वाकडे अधिकाधिक लक्ष केंद्रित केले आहे. केवळ लक्ष नाही तर ही कामे पूर्ण करतानाच सिव्हिल आणि सिस्टीम अशी कामांची विभागणी करीत स्थानके आलिशान करण्यावर भर दिला आहे.

सांताक्रुझ स्थानकाचे काम ८४ टक्के झाले आहे. अंधेरी आणि वांद्रे येथील सर्व्हिस रोडला जोडणारे प्रत्येक दोन प्रवेशद्वार येथे असणार आहेत. स्कायवॉक मार्गे सांताक्रुझ रेल्वे स्थानकाशी मेट्रोची अंतर्गत जोडणी दिली जाणार आहे.

## एक नजर कामावर





अंधेरी व वांद्रेच्या सर्व्हिस रोडला जोडणारे दोन प्रवेशद्वार असतील.


सांताक्रुझ स्थानकाचे ८४ टक्के काम पूर्ण


स्कायवॉक मार्गे सांताक्रुझ रेल्वेस्थानकाशी जोडणी

मुंबई सेंट्रल स्थानक आकार घेत आहे. फलाटासह इतर कामे प्रगतिपथावर आहेत. स्थानक कार्यान्वित होताच पश्चिम रेल्वे मार्गावरील मुंबई सेंट्रल स्थानकाशी अदलाबदल जोडणी दिली जाईल.

कामे टक्क्यांत

| स्थानके | सिव्हिल कामे | सिस्टीम कामे |
|---|---|---|
| कफ परेड | ९३.४ | ४९.६ |
| विधान भवन | ९२.४ | ४८.९ |
| चर्चगेट | ९१.२ | ४१.३ |
| हुतात्मा चौक | ८६.६ | ३८.७ |
| सीएसएमटी | ८७.८ | ४२.५ |
| काळबादेवी | ६१.१ | २७.५ |
| गिरगाव | ४७.४ | २७.५ |
| ग्रँट रोड | ७३.९ | २७.५ |
| मुंबई सेंट्रल | ८४ | ४२.१ |
| महालक्ष्मी | ८२.५ | ३८.३ |
| सायन्स म्युझियम | ८३.८ | ३८.७ |
| आचार्य अत्रे चौक | ८०.२ | ३८.१ |
| वरळी | ८२ | ३९ |
| सिद्धिविनायक | ९३.३ | ५१.७ |
| दादर | ८६.२ | ४०.८ |
| शीतलादेवी | ८५.६ | ३८.८ |
| धारावी | ८७.१ | ४४.१ |
| बीकेसी | ८३.७ | ४५.७ |
| विद्यानगरी | ८६.६ | ४८.६ |
| सांताक्रुझ | ८४.३ | ४३.२ |
| राष्ट्रीय विमानतळ | ८७.८ | ५१.५ |
| सहार रोड | ८८.१ | ५१.३ |
| विमानतळ | ८८.३ | ५१.५ |
| मरोळ नाका | ९२.१ | ५२ |
| एमआयडीसी | ९४.७ | ७०.८ |
| सीप्झ | ९४.५ | ६७.७ |